# ज्योती

*****************************************************************************************************

नॉर्थईस्ट ओहायो मराठी मंडळ www.neomm.org NEOMM Tax ID: 341644989

January 2009

*****************************************************************************************************

## कार्यकारिणी २००९

अध्यक्ष: जयवंत मसुरेकर

उपाध्यक्ष: संध्या देशपांडे

सचिव: श्रीकांत लिमये

कोषाध्यक्षा: दीपा देशपांडे

सांस्कृतिक कार्यवाह व ज्योती संपादक: सरोज पागेदार

'ज्योती 'मुद्रक--वितरक:

सरोज पागेदार

वेब मास्टर: गौरी मसुरेकर

सहाय्य:

विश्वस्त--मेधा गोडबोले, शोभा तामसकर, अशोक पाटील

************************

## ज्योतीसाठी साहित्य

गावातील साहित्यिक मंडळींकडून *ज्योती* मध्ये साहित्याची आवश्यकता आहे. आपले लेख, कथा, कविता, विनोद; दर सम महिन्याच्या (फेब्रु., एप्रिल, जून इत्यादि) १५ तारखे पर्यंत इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवावे. मराठी टायपिंगची सोय हस्तलिखित पानी $१० दराने उपलब्ध आहे.

*****************

**Advertisement Rates**

| | |
|---|---|
| Qtr Page: | $25 |
| Half Page: | $50 |
| Full Page: | $75 |

Rates are double for Diwali issue

## संपादकीय

– सरोज पागेदार

नॉर्थ ईस्ट ओहायो मराठी मंडळाच्या सर्व सभासदांना नवीन कार्यकारिणीचा नमस्कार व नव्या वर्षाच्या शुभेच्छा!

नव्या कार्यकारिणीचे अध्यक्षपद आता तरुण पिढीतील, जयवंत मसुरेकरने घेतले आहे. त्याला मदत करण्यासाठी सौ. संध्या देशपांडे तयार झाल्या आहेत. सचिव आहेत श्री. श्रीकांत लिमये व खजिनदार सौ. दीपा देशपांडे. सांस्कृतिक कार्यकर्ती मी आहे व ज्योतीचं संपादनही मीच करणार आहे. ह्या २००९च्या समितीला उत्साही ठेवण्यासाठी सर्व सभासदांचा वेगवेगळ्या प्रकारचा पाठिंबा हवा आहे. ज्यांनी वार्षिक वर्गणी दिली नसेल त्यांनी पाठवून द्यावी, ज्योतिसाठी लिखाण पाठवावे, आयोजित कार्यक्रमांना हजर रहावे आणि आपल्या मराठी मित्रमैत्रिणींना मंडळाचे सभासद होण्याची विनंती करावी.

२००८ च्या अध्यक्ष श्रीमती सुनंदा कुलकर्णींच्या नेतृत्वाखाली त्यांच्या समितीने अतिशय उत्तम व यशस्वी कार्यक्रम सादर केले हे आपण जाणूनच आहात. त्या सर्वांचे मनापासून अभिनंदन व आभार.

तसंच ह्या वर्षी ज्यांनी आजीव किंवा वार्षिक वर्गणी भरली त्यांचेही आभार.

या वर्षीचा मंडळाचा पहिला कार्यक्रम होळीचा आहे, मार्च २१, २००९ला. मराठी मंडळाच्या वेबसाईटवर माहिती उपलब्ध असेल. तेव्हां सर्व सभासदांना विनंति आहे की वेबसाईटला ( www.neomm.org ) वारंवार भेट द्या. कार्यकारिणीच्या सभासदांचे संपर्क ह्या ज्योतीत दिले आहेत.

पुढील ज्योतीत प्रसिद्ध करण्यासाठी सोप्या पाककृती हव्या आहेत. (ज्यासाठी फार जिन्नस किंवा वेळ लागणार नाही) हे सदर बायका व पुरुष दोन्हींसाठी आहे.

तसंच पुढील म्हणींवर आधारलेली आटोपशीर गोष्टी हवी आहे. "अडला हरी गाढवाचे पाय धरी". तुमची कल्पनाशक्ती व प्रतिभा कसास लावा व बऱ्याच गोष्टी लिहून पाठवा. उत्तम गोष्टी प्रसिध्द करण्यात येतील.

वरील लिखाण बराहा वर्ड मध्ये पाठवावे. ह्याबद्दल कांही प्रश्न असल्यास जरूर विचारा.

******************************************

## आगामी कार्यक्रम

### *HOLI*

**On March 21 2009**

**Time: 5.30 -10 PM**

Clague Cabin
Corner of Clague Road
and Hilliard Road
Westlake OH 44145

**Details of the program:**
**5.30 PM registration**
**6.00 PM Holi**
**6.45 Music Program**
**8.00 PM Dinner**

************************

Event tickets
Members $15
Non members $20
Children (5 to 12) $ 8.00

**RSVP will be appreciated**

By March 11, 2009

**Upcoming Events of 2009**
**Maharashtra Day: May**
**Ganeshotsav: August**
**Kojagiri: September**
**Diwali: November 7**

## अध्यक्षीय मनोगत

नमस्कार मंडळी,

दगडाला गन्ध लावला तर त्यालाही देवपण येते. माझी काहीशी तशीच स्थिती झाली आहे. "अध्यक्ष" ह्या पदवीच्या गन्धासोबत येणारे मोठेपण तुम्ही सर्वांनी इतक्या प्रेमाने बहाल केले असले तरी प्रत्यक्षात ही आपल्या मायमराठीची व तिच्या उत्तर-पूर्व ओहायो भागातील लेकरांची सेवा करण्याची संधी आहे हे पूर्ण लक्ष्यात ठेवून मी ही जबाबदारी पार पाडीन. अर्थात यात मला आपल्या अनुभवी आणि जाणत्या कार्यकारी मंडळाचीही साथ आहेच. सुनंदाताईंच्या कार्यकारी मंडळाने गेल्या वर्षी केलेल्या इतक्या चांगल्या कामानंतर ही जबाबदारी संभाळायची म्हणजे तेंडुलकर सेंच्युरी मारुन गेल्यावर फलंदाजीला उतरण्यासारखे आहे.

गेली जवळ जवळ तीन तपे तुम्ही सर्वांनी मंडळाला भरगोस सहकार्य आणि प्रतिसाद दिला आहे. तो तसाच ह्या वर्षीही यालच ह्याची मला खात्री आहे. गेल्या अठरा महिन्यातील आर्थिक घडामोडी पाहता उत्साहाने सण साजरे करणे जरा कठीणच आहे पण वादळातच झाडे मुळाचा आधार अधिक शोधतात. म्हणूनच ह्या वर्षी आम्ही खालील दोन गोष्टींवर अधिक भर द्यायचा ठरवला आहे.

१. तरुणाई: क्लिवलंडमधे कामाच्या वा शिक्षणाच्या निमित्ताने तात्पुरते स्थायिक झालेले अनेक मराठी युवक आहेत. ह्या सर्वांना मंडळात सामिल करण्यावर आम्ही विशेष भर देणार आहोत. ह्यामुळे मंडळाला नवे सभासद, नवे विचार व नवे स्वयंसेवक मिळतिल अशी आशा आहे. ह्यासाठी आम्ही नवी साधने वापरणार आहोत. उदाहरणार्थ, websites like MySpace, Facebook or Orkut. ज्या सभासदांना अथवा त्यांच्या मुलांना अश्या वेबसाइट्स वरिल मंडळाच्या वेबपेजेसची जबाबदारी घेण्याची इच्छा आहे त्यानी वेबमास्टरला आपली इच्छा कळवावी.

२. सहाय्यक सेवा: ज्या सभासदांना resume building, job search ह्या सारख्या गोष्टींमधे मदत हवी असेल त्यांच्यासाठी workshops आयोजित करता येउ शकतील. अर्थात यासाठी सभासदांचा प्रतिसाद व गरज लक्ष्यात घेऊनच असे कार्यक्रम आखले जातील. अशीच workshops मुलांसाठी आयोजित करुन त्यांना विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून मार्गदर्शन उपलब्ध करुन देता येइल.

Recently Cleveland lost one of its best community leaders, Ms. Vijaya Emani. मंडळातर्फे मी त्यांना आदरांजली व्यक्त करतो. होळीच्या कार्यक्रमात भेट होइलच.

आपला स्नेहांकित,

जय मसुरेकर

=======================================================================

## आयुर्वेद

– संध्या देशपांडे

अथर्ववेदाचे उपांग असलेला आयुर्वेद भारतीय संस्कृतीचा महान वारसा आहे. सनातन काळातील ऋषिमुनींपासून आजपर्यंत अनेक ज्ञानी जनांनी या वेदाच्या उन्नतीला योगदान दिलेले आहे.

आयु म्हणजे आयुष्य किंवा जीवन. तसंच वेद हा विद् धातू पासून घेतलेला शब्द असून त्याचा अर्थ द्न्यान किंवा जाणिव आहे. थोडक्यांत आयुर्वेद म्हणजे जीवनाचे संपूर्ण शास्त्र. ह्यांत शारीरीक मानसिक व बौधिक आरोग्याचे वर्धन व रोगनिवारण इत्यादींचा समावेश होतो. तसंच त्यात अध्यात्मिक विचार शक्तिची संतुलित गुंफण केलेली आढळते. आरोग्य टिकवून रोगांचे निर्मूलन करणारे आयुर्वेद हे अमोल शास्त्र आहे.

आयुर्वेदांत योग्य प्रमाणांत वनस्पती, खनिज व प्राणीज धातुंचा वापर शरीर स्वास्थ्याकरता केला जातो. योग्य आहार, विहार, प्राणायाम व योगासनांद्वारा शारीरीक व्याधींवर उपचार केले जातात. जीवनाकडे संपूर्णत्वाने बघण्याचा आयुर्वेदाचा दृष्टिकोण श्रेष्ठ दर्जाचा आहे.

आयुर्वेदाची देवता भगवान धन्वंतरी आहेत. सनातन काळांत अश्विनीकुमारांनी वेदांच्या बांधणीत व वृध्दींत भर घातली. पुढे ९व्या शतकांत आयुर्वेदातील मान्यवर संशोधक श्रीमान चरक, सुश्रुत तसेंच वाग्भट ह्या त्रयींनी भर घातली. १८व्या शतकांत माधवनिदान , भावप्रकाश व शारंगधर ह्यांनी त्यांत अधिक भर घातली. अनेक सिध्दांत मांडून मानवजातीचे दुख्ख निवारण करून निरोगी व सर्वांगी परिपूर्ण जीवनाची वाट दाखविली.

पारतंत्र्यानंतरचा काळ आयुर्वेदाच्या प्रगतीकरिता कठीण होता. पाश्चिमात्यांच्या प्रभावाने व विज्ञान शाखांमध्ये झालेल्या प्रचंड प्रगतीने लोकांची आयुर्वेदाबद्दलची वृत्ती उदासीन झाली. जुनाट शास्त्र म्हणून आयुर्वेदाची उपेक्षा करण्यात आली. परंतु या उदासीनतेच्या काळानंतर पुनश्च जुने ते सोने झाले आहे. आज नुसत्या भारतीयच नाही तर पाश्चिमात्य
संशोधकांचे लक्ष आयुर्वेदाकडे वळले आहे.

आज आयुर्वेद रसशाळा जोमाने संशोधनात गुंतल्या आहेत. अनेक अयुर्वेदीक महाविद्यालये स्थापन झाली आहेत. आयुर्वेदिक फार्मसींची दुकाने नवीन औषधांनी सज्ज आहेत. भारतातील अनेक राज्यांमधून आयुर्वेदीक औषधांचे उत्पादन सुरू आहे. ह्यांत महाराष्ट्रांतील एका मराठी कुटूंबाची कामगिरी उल्लेखनीय आहे. १८९९ साली दत्तात्रय कृष्ण सांडू ही आयुर्वेदीक औषधांची कंपनी स्थापन झाली. ती आज सांडू केमिकल्स ह्या नावाने प्रसिध्द आहे.सततच्या संशोधनांने दर्जेदार औषधांचे उत्पादन करण्यांत सांडू कंपनी अग्रेसर आहे.

अनेक आयुर्वेदीक औषधे जी आज सहज उपलब्ध आहेत त्यांचा ह्या लेखन मालिकेंत मी क्रमशः आढावा घेणार आहे.

<u>संत तुकाराम</u>

<u>- कौस्तुभ लेले</u>

संत तुकाराम महाराजांची जन्म-चतुःशताब्दि नुकतीच महाराष्ट्रभर धूमधडाक्याने साजरी केली गेली. धूमधडाक्याने म्हणजे फटाक्यांनी नव्हे तर टाळ-मृदंगांसह नामाचा गजर, तुकारामगाथेची पारायणे, भजनकीर्तनें आणि 'ज्ञानदेव-तुकाराम' जयघोष, यांप्रकारें, आणि विशेषतः देहू गावी. आणि या महोत्सवात वारकरी संप्रदायाचा फार मोठा वाटा होता हे सांगण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्राला संत परंपरेचा फार मोठा वारसा आहे, फार मोठी देणगी आहे. संतवचन मराठी मनावर राज्य करून आहे.

संत परंपरेला जातीभेदाची कीड कधी लागली नाही. आणि वारकरी संप्रदायही सदैव जातीभेदापासून अलिप्त राहिला याचेही कारण संत परंपराच. ज्ञानेश्वर माउलींपासून चोखा महारापर्यंत ओळखली जाणारी संतपंगत स्पष्टपणे दाखवते की आत्मानुभवाला जातीचे ना सोयर ना सुतक. 'परंपरा'शब्द पुन्हापुन्हा लिहिण्याचे कारण की या शब्दालाच कुतर्क आणि अविश्वासाची जळमटे लागू पहात आहेत. पण अत्यंत भाग्याची गोष्ट की वारकरी संप्रदायानें ही परंपरा स्वच्छ जोपासली आहे.

अनेक परचक्रें येऊनसुद्धां, आणि स्वतः आक्रमक नसतानांही, हिंदुधर्म नुसता टिकाव धरून राहिला इतकेच नाही, तर आतां जगाला योगमार्गाची ओढच नव्हे तर चटकही लावत आहे. याचे एकमेव कारण संतपरंपरा. आत्मानुभवी तो संत अशी संतपदाची व्याख्या आहे. आणि आत्मानुभव हे योगमार्गाचे परम साध्य. योग केवळ शाब्दिक सिद्धांत व तत्वें याच धर्तीचा असता, तर त्याची गति हठयोगाच्या आणि शरीरसौष्ठवाच्या फारशी पुढे गेली नसती. परंतु संत म्हणजे योगसिद्धीचे चालतेबोलते पुरावे असतात. त्यामुळेच योगपरंपरा हीसुद्धा एक सदैव जिवंत परंपरा राहिली, आणि आतां तर जगभर पसरू पहात आहे, हेही जगाचे भाग्यच.

या आत्मानुभवाची ग्वाही ज्ञानेश्वरादि सर्वच संतांनी दिलेली आहे. गोरा कुंभार लिहितो *निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे। तंव झालो प्रसंगी गुणातीत ॥* तर जनाबाई म्हणते *महाशून्य वर्ण नीळ तेथ स्वरूप केवळ। अनुहत घंटा श्रवणी ऐकूनि विस्मय जाहली जनी ॥* सेना न्हावी सांगून गेला, *जाता पंढरीसी सुख वाटे जीवा। आनंदे केशवा भेटताची ॥ .... सेना म्हणे खूण सांगितली संती। यापरती विश्रांती न मिळे जीवा ॥* आणि या पंढरीची खरीखुरी ओळख एकनाथांनी *काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल। नांदतो केवळ पांडुरंग ॥* या अभंगात करून दिली आहे.

तुकाराममहाराजांनी *आनंदाचे डोही आनंदतरंग।* या अभंगात आपला स्वानुभव लिहिला. रामदासस्वामींचा मनाचा श्लोक *कळे आकळे रूप ते ज्ञान होता। तिथे आटली सर्वसाक्षी अवस्था। मना उन्मनी शब्द कुंठीत राहे। तो हे तोचि तो राम सर्वत्र पाहे ॥ म.श्लो. २०० ॥* अगदी स्पष्टच आहे.

ज्ञानेश्वरमाउलींनी *आजी सोनियाचा दिनु। वर्षे अमृताचा घनु। हरी पाहिला रे हरी पाहिला ॥* या अभंगात आपला आपला आत्मानुभव प्रगट केला. ज्ञानेश्वरीत भगवद्गीतेतील योगशास्त्र निरूपण केले आणि *अमृतानुभव* ग्रंथात शब्दातीत आत्मानुभवाला शब्दांच्या कवेत आणून अभ्यासाला बैठक दिली.

तुकाराम महाराजांनी स्वतः संतवचनाचे कौतुक असे केले आहे *संतांची उच्छिष्टें बोलतो उत्तरें। काय म्यां गव्हारें जाणावे हे ॥* आणि आणखी एका अभंगात आपल्याला कळकळीचा उपदेश देतात *धरी धरी आठवण। मानी संतांचे वचन ॥* आणि सुचवूनही गेले की *तुका म्हणे आहे उघड हित घात। जयाचे उचित करा तैसे।*

==========================================================================

**होळीसाठी खास कार्यक्रम**

**मार्च २१, २००९**

**या वर्षाच्या मंडळाच्या पहिल्या कार्यक्रमासाठी येताहेत**

**<u>कॅनडा येथील प्रसिद्ध गायक श्री. नरेंद्र दातार व कुमार रवी दातार</u>**

**ही वडील व मुलाची जोडी मराठीतील विविध गाणी सादर करतील**

**मागील मराठी कन्व्हेंशनमध्ये या जोडीने अतिशय सुंदर मैफल गाजविली होती**

**तेंव्हा त्यांचं गाणं ऐकण्याची संधी सोडू नका.**

## आभार

- सौ. स्मिता सामंत

२००७ आणि २००८ मध्ये मला क्लिव्हलंडच्या मराठी मंडळाची कोषाध्यक्षा म्हणून काम करायची सुवर्णसंधी लाभली. या अवधीत तुम्हा सर्वांची नव्याने ओळख झाली. दोन्ही वर्षांच्या सर्व समिती सभासद आणि ट्रस्टीज बरोबर काम करायला खूप मजा आली.

२००७ चे अध्यक्ष डॉ. पराग काळे यांचे सर्वप्रथम आभार मानते. एक सदैव आनंदी, हसरं व्यक्तिमत्व. कामात व्यस्त असूनही मंडळाची बरीचशी कामे त्यांनी स्वतः केली. त्यांच्याकडून बरेच काही शिकायला मिळाले – पटापट अचूक निर्णय घेणे; एकदा घेतलेले निर्णय न बदलता अमलात आणणे इ.

२००८ च्या अध्यक्षा सुनंदा कुलकर्णी – अतिशय उत्साही आणि कामाला सदैव तयार. सुनंदाने २००७ च्या डिसेंबर मधेच चक्क $ ४५० ज्योती अंकासाठी जाहिराती आणून मिळविले. तिने डॉ. मेधा गोडबोले यांच्या मदतीने $ १५८४ देणगी स्वरूपात आणि $ २२०० ज्योती जाहिरात उत्पन्न मिळवून मंडळाच्या धनराशीत मोलाची भर टाकली.

२००७ आणि २००८ चे ऑडिटर, श्री. अजित पागेदार यांचे आभार मानायला तर शब्दच अपुरे पडतील. मंडळाच्या वार्षिक जमाखर्चाचा आलेख बनविण्यात त्यांची मदत आणि मार्गदर्शन अतिशय उपयुक्त होते. तसेच मंडळाच्या बैठकींच्या निमित्ताने डॉ. हेमांगी काळे, डॉ. सरोज पागेदार, सौ. सरोजिनी शेट्टी, डॉ. मेधा गोडबोले, सौ सोनाली गोखले आणि सुनंदा कुलकर्णी या सुगृहिणींच्या हातचे रुचकर भोजन खायला मिळाले. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

सर्वात शेवटी, गेली दोन वर्ष मंडळाचे हिशोब लिहिण्यास मला मदत केल्याबद्दल माझ्या नवऱ्याचे, नितीन सामंतचे मनापासून आभार मानते. तुम्हा सर्व वाचकांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा आणि मंडळावरील लोभ असाच राखावा ही विनंती.


Come & enjoy our New Indian Vegetarian Buffet Dinner every night.

Saffron PATCH

AUTHENTIC INDIAN CUISINE

Home of Fresh, Authentic Indian Cuisine
Come, visit us & experience a unique and mystic evening
While our chef prepares sizzling meat platters
and bakes bread instantly.

This hidden jewel is located in the Tower East Building.

20600 CHAGRIN BLVD,
SHAKER HEIGHTS, OHIO
216-295-0400

# BDS

Financial Service Corporation

*Registered Investment Advisor*

30405 Solon Road, Suite 16
Solon, OH 44139-3415

**Are your investments focused on your future ... or just on today's headlines?**

We can help you to

Prepare a roadmap for your future & to stay the course!

**Our services include:**

Retirement Planning Investment Planning Savings for College Tax Planning

Visit our website www.bdsfsc.com to learn more about us.

To get a second opinion,

call us at 440-248-5625 Or e-mail to BDS@BDSFSC.com

***Ashok Shendure**, MS, MBA, CFP®, CEBS* ***Rajanee Shendure**, MBA, CFP®*

Securities and investment advisory services offered through FSC Securities Corporation, Member FINRA/SIPC and a registered investment adviser. Additional investment advisory services offered through BDS Financial Service Corporation, a registered investment adviser not affiliated with FSC Securities Corporation.

Planning Pays Off!


**If not delievered, please return to:**
Saroj Pagedar
2317, Brigadoon Court
Westlake, Ohio 44145